# प्रेसनोट

दि. १६/१०/२०२४

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून झोपडपट्टी पुर्नवसन कार्यालय, पुणे येथील तत्कालीन उपमुख्य अधिकारी यांचेवर ज्ञात उत्पनापेक्षा जास्त मालमत्ता बाळगले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २९९/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १३ (क)(ड), १३ (१)(ई) सह १३(२) सह भा.दं.वि. क. १०९ तसेच बेकायदेशीर उत्पन्नाचा फायदा घेण्याकरीता बनावट बाँड दस्त चौकशी अधिका-यास सादर करुन शासनाची फसवणुक केल्याने भा.दं.वि. कलम ४२०, ४६७, ४६८, ४६९, ४७५, ४७४, ४७७, १२० (ब). |
| तक्रारदार / फिर्यादी | श्रीमती. डॉ. शितल जानवे /खराडे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. शिरीष रामचंद्र यादव, तत्कालिन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन कार्यालय, पुणे (वर्ग-१)<br>२) सौ. प्रतिक्षा शिरीष यादव (पत्नी) |
| अपसंपदा निष्पन्न रक्कम | १,३८,७४,०४४/- रुपये (कायदेशीर ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त २०.३४% ) |

गुन्हा दाखल दिनांक :- १६/१०/२०२४ रोजी.

थोडक्यात माहिती :- यातील आरोपी लोकसेवक श्री. शिरीष यादव, तत्कालिन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन कार्यालय, पुणे यांनी परिक्षण कालावधीत संपादीत केलेल्या अपसंपदेबाबत पुरेशी व वाजवी संधी देऊन सुद्धा ते समाधानकारकरित्या स्पष्टीकरण / हिशोब देवू शकले नाहीत. तसेच त्यांनी संपादित केलेली मालमत्ता त्यांचे ज्ञात स्त्रोताच्या उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत असल्याने लोकसेवक श्री. शिरीष यादव यांनी १,३८,७४,०४४/- रुपये (२०.३४%) इतकी अपसंपदा भ्रष्ट मार्गाने धारण करुन उद्देश पुर्वक स्वतःला व त्यांच्या पत्नीला अनुचितपणे अवैधरित्या समृद्ध केले असून, त्यास पत्नी सौ. प्रतीक्षा यादव यांनी त्यांना अपप्रेरणा दिली आहे. सदरची मालमत्ता ही भ्रष्ट मार्गाने धारण केलेली अपसंपदा असून ती त्यांच्या लोकसेवक सेवा कालावधीतील वैध उत्पन्नापेक्षा अधिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणून त्यांचेविरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. अनिल कटके, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

१६/१०/२४

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.